सोबत मा. राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. रासेयो-२०२६/प्र.क्र४३/रासेयो कक्ष, दिनांक १८/०५/२०२६ अन्वये **दिनांक १० जून, २०२६ रोजी जागतिक नेत्रदान दिवस निमित्त मरणोत्तर नेत्रदान जनजागृती व नेत्र तपासणी मोहिम आयोजित करणेबाबत** कळविण्यात आले आहे. सोबत जोडलेल्या पत्राचे अवलोकन करुन त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

पृष्ठांकन क्र: तंशिविकाअ/शिक्षण/२०२६/ 1271
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दिनांक. 19 MAY 2026

**प्रति,**

प्राचार्य, सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या पत्रात दिल्यालेल्या सुचनेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

प्रत :- **प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

Endos

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.**

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

**क्रमांक: रासेयो-२०२६/प्र.क्र.४३/रासेयो कक्ष** **दिनांक: १८ मे, २०२६**

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
रासेयो संलग्नित,
सर्व विद्यापीठे/ संचालनालये

**विषयः- दिनांक १० जुन , २०२६ रोजी जागतिक नेत्रदान दिवस निमित्त मरणोत्तर नेत्रदान जनजागृती व नेत्र तपासणी मोहिम आयोजित करणे बाबत.....**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दिनांक १० जुन, २०२६ रोजी जागतिक नेत्रदान दिवस निमित्त संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नेत्र चिकित्सा शिबिर (Eye Checkup Camp) व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती (Eye Donation Campaign) मोहिम या महत्त्वाच्या विषयांवर उपक्रम राबविण्याचे योजिले आहे. यानुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या विद्यमाने संचालक, राज्यातील सर्व कृषि व अकृषि विद्यापीठे/संचालनालयाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये दिनांक १० जुन, २०२६ रोजी नेत्र चिकित्सा शिबिर (Eye Checkup Camp) व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती (Eye Donation Campaign) मोहिम आयोजित करण्याबाबत आपल्या स्तरावरून सर्व विद्यापीठ व विद्यापीठातर्गंत महाविद्यालयांना सूचित करावे. त्या अनुषंगाने, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत आपल्या विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये खालीलप्रमाणे उपक्रम आयोजित करावेत, ही विनंती.

१. **नेत्रदान जनजागृती अभियानातर्गंत मोफत नेत्र तपासणी शिबिर (प्रसिद्ध नेत्रतज्ञ / रुग्णालयांच्या सहकार्याने)**
२. **नेत्रदान नोंदणी मोहिम (Eye Donation Pledge Drive) तसेच विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये नेत्रदानाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन.**
३. **सोशल मीडियाद्वारे व्यापक प्रसार व जनजागृती.**

सदर दिनांक १० जुन, २०२६ रोजी जास्तीत-जास्त विद्यार्थी व जनमाणसांचा या उपक्रमात/जनजागृती अभियानात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत आपले विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयां मार्फत सहभाग वाढविण्यात यावा. सदर उपक्रम कालावधी मध्ये नेत्ररोगतज्ञांचे नेत्रदाना संबधी व्याख्यान आयोजित करुन विद्यार्थ्यांमध्ये / कर्मचा-यांमध्ये पुरेशी जनजागृती करावी व प्रत्यक्ष नेत्रदानाचे फॉर्म भरुन घेण्यात यावेत.

सहसंचालक, तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र. 1878 दिनांक 18.05.2026

**(डॉ. मिलिंद काळे)**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

**प्रत- माहिती व योग्य त्याकार्यवाहीस्तव सादर.**

१. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२. मा.अपर मुख्य सचिव (उ. व तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप सचिव(समन्वय) उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
४. रासेयो क्षेत्रिय संचालक, रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे.
५. निवड नस्ती रासेयो कक्ष

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**
एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२६/प्र.क्र.४३/रासेयो कक्ष, दिनांक:- १८ मे, २०२६

**प्रति,**
**मा. कुलगुरू,**
सर्व विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य.

**विषय : दिनांक १० जुन - "नेत्रदान दिन" निमित्त राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये नेत्रदान जनजागृती अभियान व नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्याबाबत...**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, दिनांक **१० जून हा "नेत्रदान दिन"** म्हणून संपुर्ण जगामध्ये साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून समाजामध्ये नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच विद्यार्थ्यांच्या नेत्र आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने, **राष्ट्रीय सेवा योजना (NSS)** अंतर्गत आपल्या विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये खालीलप्रमाणे उपक्रम आयोजित करावेत, ही विनंती :

**१.नेत्रदान जनजागृती अभियानातर्गंत मोफत नेत्र तपासणी शिबिर (प्रसिद्ध नेत्रतज्ञ / रुग्णालयांच्या सहकार्याने)**
**२.नेत्रदान नोंदणी मोहिम (Eye Donation Pledge Drive) व विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये नेत्रदानाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन**
**३.सोशल मीडियाद्वारे व्यापक प्रसार व जनजागृती**

सदर दिनांक १० जुन, २०२६ रोजी जास्तीत-जास्त विद्यार्थी व जनमाणसांचा या उपक्रमात/जनजागृती अभियानात सहभाग आपल्या विद्यापीठा मार्फत वाढविण्यात यावा. सदर उपक्रम कालावधी मध्ये नेत्ररोगतज्ञांचे नेत्रदाना संबधी व्याख्यान आयोजित करुन विद्यार्थ्यांमध्ये / कर्मचा-यांमध्ये पुरेशी जनजागृती करावी व प्रत्यक्ष नेत्रदानाचे फॉर्म भरुन घेण्यात यावेत.आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

आपला विश्वासू

**(डॉ. मिलिंद काळे)**
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन